मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०७ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • जुलै-२०२३



# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०७ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • जुलै-२०२३

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

सदस्यता शुल्क

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- कुतूहल २४
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३४
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०


## चित्रकथा


- चित्रकथा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष : हेन्री फोर्ड ०७
- दिनविशेष : कारगिल विजय... ०८
- विशेष : जागतिक व्याघ्र दिन १५
- संतकथा : संत एकनाथ २१
- भ्रमंती : बाणकोट किल्ला २८
- प्रेरक प्रसंग : स्वामी विवेकानंद ३६
- विशेष : क्रीडा पुरस्कार ४२
- प्रेरक प्रसंग : द्रष्टा ४६
- १२ वी नंतर विविध सामाईक.... ४८








## कथा


- महासती सुलोचना ०५
- देवाचा आशीर्वाद ०९
- शक्तिपेक्षा युक्ती श्रेष्ठ २०
- शांततेचा शोध २२
- सारासार विवेक ३२
- प्रोत्साहन ४४








## कविता


- एक होऊनि वृक्ष लावू या १२
- आज आहे रविवार ३३
- यंदा हे प्रॉमिस पूर्ण करायचंय ३७
- चला जाऊ शाळेच्या गावा ४५

दोन शब्द

# आपणही देवदूत होऊ शकतो

सहाव्या इयत्तेत शिकणारा दीपक आपल्या आजीसोबत राहत होता. आई-वडील नसल्याने आजीनेच त्याचा सांभाळ केला. तो शाळेत जाण्यापूर्वी दररोज सकाळी पन्नास घरी पेपर टाकत असे आणि त्या बदल्यात मिळालेल्या पैशातून आपला शिक्षणाचा खर्च भागवायचा.

पावसाळा सुरु झाला, की तेव्हा मात्र त्याची खूप पंचायत होई. वर्तमानपत्रं भिजू नयेत म्हणून प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळून घेई. स्वत: मात्र चिंब भिजून जात असे. त्याच्या मनात येई, की आपल्याकडे जर रेनकोट असता, तर किती छान झालं असतं; परंतु रेनकोट घेण्याएवढे पैसे आजीकडेही नव्हते. आजी त्याची समजूत घालत म्हणायची, बाळ! आपल्याला काही अडचण असेल तर ती देवाला सांगावी. मग योग्य वेळ आली, की देव आपली नक्की मदत करतो. आजीने सांगितल्याप्रमाणे दीपकने प्रार्थना केली आणि तो झोपी गेला.


दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे दीपक पेपर टाकत होता. पावसात भिजत असलेल्या दीपकला पाहून राजूला दया आली. त्याने नुकताच नवीन रेनकोट घेतला होता. गेल्या वर्षाचा जुना रेनकोट अजूनही चांगल्या स्थितीत होता. शाळेत जाताना राजूने तो रेनकोट दीपकला दिला. दीपकचा चेहरा आनंदाने फुलून गेला. तो पटकन म्हणाला, "तुला देवाने पाठवलं ना!" राजू म्हणाला, "नाही रे! मी तुझा मित्र आहे असं समज; पण तू हे का विचारतोयस?" दीपक म्हणाला, "आजीने सांगितल्याप्रमाणे काल रात्री मी देवाला रेनकोट दे, अशी प्रार्थना केली आणि देवाने रेनकोट पाठवून दिला.... हं म्हणजे नक्कीच तू देवदूत असणार." असं म्हणत दीपकने राजूला हात जोडून नमस्कार केला.

राजू काही न बोलता मुकाट्याने शाळेत गेला. प्रार्थनेच्या वेळी त्याने ही हकीकत सर्वांना सांगितली. तो म्हणाला, "मित्रांनो! आपल्याकडे गरजेपेक्षा कितीतरी वस्तू अशाच पडून राहतात. आपणही अशाच कोणा गरजवंताला त्या देऊन त्यांची गरज भागवू शकतो, नाही का?"

सर्वांना ही कल्पना आवडली. सारे एका सुरात म्हणाले, "म्हणजे आपणही देवदूत होऊ शकतो."

- राजेंद्र थोरात





पौराणिक कथासार

# महासती सुलोचना

सुलोचना ही वासुकी नागाची कन्या आणि रावणपुत्र मेघनाद याची पत्नी.

राम-रावण युध्दाच्या प्रसंगी मेघनादाशी युध्द करायला जाण्यापूर्वी श्रीरामाने लक्ष्मणाला आधीच सांगितले, की या युध्दामध्ये तू मेघनादाचा वध करशील यात शंकाच नाही; परंतु मेघनादाचे शीर मात्र जमिनीवर पडू देऊ नकोस. अन्यथा आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागेल. त्याप्रमाणे युध्दाच्या वेळी लक्ष्मणाच्या बाणाने मेघनादाचा जेव्हा वध झाला तेव्हा लक्ष्मणाने त्याचे शीर जमिनीवर पडू दिले नाही. हनुमंताने ते शीर प्रभू रामचंद्रजींकडे सोपवले. लक्ष्मणाच्या दुसऱ्या बाणाने मेघनादाचा उजवा हात खांद्यापासून तुटून सुलोचनेजवळ येऊन पडला. त्या हाताने लिहिले, की लक्ष्मणाच्या बाणाने माझा मृत्यू झाला असून माझे शीर श्रीरामांच्या शिबिरात आहे.

सुलोचना या वृत्ताने व्याकूळ होऊन रडू लागली. ती रावणाला म्हणाली, की तुम्ही माझ्या पतीचे शीर घेऊन या. मला सती जायचे आहे. तेव्हा रावण

म्हणाला, “पुत्री, तू स्वत: जाऊन ते शीर घेऊन ये. मला खात्री आहे, श्रीराम मर्यादापुरुषोत्तम आहेत. त्यांच्या शिबिरामध्ये हनुमंतासारखे ब्रह्मचारी, लक्ष्मणासारखे तपी-त्यागी महापुरुष असल्याने तुला कसलाही धोका नाही. तू निश्चिंतपणे जा.” सुलोचना श्रीरामांच्या शिबिरात गेली तेव्हा श्रीराम स्वत: पुढे येऊन तिला प्रणाम करत म्हणाले, “देवी, तू महासती आहेस, महापतिव्रता नारी आहेस. तुझ्या पुण्याची कथा मी काय वर्णावी ? तुझा पती देखील सद्‌गुणी आणि महापराक्रमी होता.” असे म्हणून त्यांनी मोठ्या सन्मानाने मेघनादाचे शीर तिच्या हवाली केले. सुग्रीव सुलोचनेला म्हणाला, की मेघनादाचे शीर इथं आहे हे तुला कसं समजलं ? तेव्हा तिने घडलेला वृत्तांत सांगितला. त्यावर सुग्रीव शंका घेत म्हणाला, “जर निष्प्राण बाहू लिहू शकतो, तर हे निष्प्राण शीर देखील हसू लागेल.” हे ऐकताच सुलोचना म्हणाली, “जर मी महापतिव्रता असेल, तर हे शीरदेखील हसू लागेल.” त्याचवेळी ते शीर मोठ-मोठ्याने हसू लागलं. श्रीरामांच्या शिबिरात सर्वांनी सुलोचनेचा जयजयकार केला.

आपल्या पतीचं शीर घेऊन सुलोचना चंदनाच्या चितेवर बसली आणि लक्ष्मणाला म्हणाली, “लक्ष्मणजी ! तुम्ही असं चुकूनही समजू नका, की मी मेघनादाचा वध केला. त्रैलोक्यात त्यांना मारणे कोणाही पुरुषाला शक्य नव्हते; परंतु तुम्ही पुण्यपुरुष आहात. चौदा वर्षे निद्रेचा त्याग करुन तुम्ही भगवंताची सेवा केली. तुमची पत्नी उर्मिला महापतिव्रता आहे. माझ्या पतीने परनारीचे अपहरण करणाऱ्या राजाला साथ देत त्याच्या बाजूने युध्द केलं, केवळ त्यामुळेच त्यांचा मृत्यू झाला.” असे म्हणून ती मेघनादाच्या मृतदेहासोबत सती गेली. ❖



विशेष - गुरुपौर्णिमा

# शिष्याचे कर्तव्य


एकदा सिकंदर बादशहाचे गुरु अरस्तू सिकंदराला घेऊन एका घनदाट जंगलातून जात होते. वाटेत त्यांना एक ओढा लागला. ओढ्याच्या पाण्याचा वेग काही ठिकाणी जास्त तर काही ठिकाणी कमी होता. मध्येच भोवरेही दिसत होते. पाण्याच्या खोलीचा अंदाज लागत नव्हता. ओढा पार करुन त्यांना पलीकडे जायचे होते.

ओढा आधी कोण पार करणार, याबाबत दोघांत एकमत होत नव्हते. दोघांनाही हा मार्ग नवीन होता. बराच वेळ चर्चा केल्यानंतर सिकंदरने आधी आपण स्वत: ओढा पार करुन जायचे निश्चित केलं. शेवटी अरस्तूने त्याची विनंती मान्य केली व त्याला आधी ओढा पार करण्याची अनुमती दिली; परंतु अरस्तू नाराज होत म्हणाले, “सिकंदर, तू माझी अवज्ञा केलीस. माझा आदेश मोडून तू हट्टाने पुढे चाललास.”

त्यावर सिकंदर अतिशय नम्रपणे म्हणाला, “गुरुदेव, मला माझं कर्तव्य तसं करण्यास भाग पाडत आहे. कारण एक अरस्तू हजारो सिकंदर निर्माण करु शकतील; पण हजारो सिकंदर एक अरस्तू निर्माण करु शकणार नाही. म्हणून तुमचे सुरक्षित राहणे जगासाठी फार महत्त्वाचे आहे.”

शिष्याच्या या उत्तरावर गुरु अरस्तू प्रसन्न झाले. ❖

# हेन्री फोर्ड



मित्रांनो, फोर्ड हे नाव ऐकताच डोळ्यासमोर येते अमेरिकन उद्योगात क्रांती घडवून आणणारे, महान संशोधक, फोर्ड कंपनीचे संस्थापक, अमेरिकेची १६१ पेटंट मिळवणारे जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तिमत्व म्हणजे हेन्री फोर्ड.

हेन्री फोर्ड यांचा जन्म ३० जुलै १८६३ रोजी मिशिगन राज्यात डियरबर्न शहरात झाला. त्यांचे वडील आयर्लंडचे रहिवासी होते; पण आपल्या आई-वडिलांसह १८४७ मध्ये ते अमेरिकेत डियरबर्न येथे जाऊन शेती करु लागले. हेन्री फोर्ड यांनी पंधरा वर्षापर्यंत शालेय शिक्षण घेतले आणि ते शेतातही काम करु लागले; पण सुरुवातीपासूनच त्यांना सर्व प्रकारच्या यंत्राबद्दल विलक्षण कुतूहल होते. वडिलांच्या विरोधात जाऊन ते इथे रात्री शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या गाड्या फुकटात दुरुस्त करुन देत.

हेन्री सोळा वर्षाचे असतानाच घर सोडून डिट्रॉइट येथे गेले. तेथे त्यांनी बऱ्याच कारखान्यात काम करुन तांत्रिक ज्ञान प्राप्त केले. ते पुन्हा १८८६ मध्ये घरी परतले. नंतर त्यांनी वडिलांच्या दिलेल्या ऐंशी एकर जमिनीवर गाड्या दुरुस्त करण्याचा कारखाना उभारला. १८८७ मध्ये ते विवाहबध्द झाले. त्याच वर्षात त्यांनी गॅस इंजिन आणि शेतात काम करणारे मशीन बनवण्याचे ठरवले. यंत्राविषयी असणाऱ्या अत्यंत आवडीमुळे ते पुन्हा घर सोडून गेले. तेथे १८९० ला डिट्राईट एडिसन इलेक्ट्रिक कंपनीमध्ये काम करण्यास सुरुवात केली. १८७३ ला पेट्रोलवर चालणारी पहिली गाडी तयार केली. ती गाडी चार हॉर्स पॉवरची होती. तिची गती ताशी २५ मैल होती. नंतर त्यांनी १८९९ मध्ये नोकरी सोडून डिट्राईट ऑटोमोबाईल कंपनीची स्थापना केली. तिथेही त्यांनी नोकरी सोडली आणि रेसमध्ये यश संपादन केले. त्यामुळे हेन्री खूप प्रसिध्दीस आले. पुढे त्यांनी १९०३ मध्ये फोर्ड कंपनीची स्थापना केली. त्यात त्यांना भरघोस यश मिळाले.

पहिल्या वर्षी १७०८ गाड्या बनवल्या. दुसऱ्या वर्षी पाच हजार गाड्या विकल्या गेल्या. नंतर ते फोर्ड कंपनीचे अध्यक्ष होऊन कंपनीचे मालकही झाले. १९२४ पर्यंत त्यांच्या कंपनीने वीस लाख गाड्या, ट्रक, ट्रॅक्टर यांची निर्मिती केली. पुढे १९३१ पर्यंत त्यांच्या गाड्यांची संख्या दोन कोटीपर्यंत गेली. नंतरच्या काळात फोर्ड यांची गणना जगातील सर्वात श्रीमंत लोकांमध्ये केली जाऊ लागली. हेन्री यांनी डीयरबर्नमध्ये एक औद्योगिक संग्रहालय तसेच एडिसन ऑफ टेक्नॉलॉजीची स्थापना केली. ७ एप्रिल १९४७ रोजी हेन्री फोर्ड यांचे निधन झाले.

ध्येयवेडी माणसं खरंच काहीतरी वेगळी गोष्ट नक्की करतात. त्यापैकीच हेन्री फोर्ड एक म्हणावे लागतील. ❖



# कारगिल विजय दिवस

२६ जुलै हा भारतीय सैन्यासाठी शौर्याचा दिवस. याच दिवशी कारगिल युध्दात भारताने आपल्या विजयाचा ध्वज फडकावला होता. हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या आठवणी जागवल्या जातात.

भारतीय सैन्याच्या जवानांनी कारगिलमध्ये विपरित परिस्थितीत शत्रूसैन्याला नामोहरम केले. देशासाठी शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची व बलिदानाची आठवण करुन आपली देशभक्ती जागृत करण्यासाठी कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन देशभरात करण्यात येते.

भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये १९९९ साली युध्द झालं. सुरुवातीला पाकिस्तानी सैन्याने घुसखोरी केली असं वाटत होतं. काही दिवसांनी आपण त्यांना बाहेर हुसकावून लावू असं भारतीय लष्कराला वाटलं; परंतु नियंत्रण रेषेवरील स्थिती आणि घुसखोरांच्या रणनीतीचा अंदाज घेतला असता हा मोठ्या हल्ल्याचा कट असल्याचे समजले. त्यानंतर भारत सरकार आणि लष्कराने **ऑपरेशन विजयची** आखणी करुन दोन लाख सैनिक सीमारेषेवर पाठवले. हे युध्द लडाखच्या कारगिलमध्ये दोन महिने चालले. २६ जुलै रोजी या युध्दाचा शेवट झाला.

युध्दाच्यावेळी भारतीय लष्कराने पाकिस्तानी घुसखोरांना देशाबाहेर हाकलवून लावलं. ऑपरेशन विजयचा भाग म्हणून टायगर हिलसह लष्कराच्या इतर सर्व चौक्यांवर कब्जा मिळवला.

या विजयात भारताच्या वायुसेनेने **ऑपरेशन सफेद समुद्र** आणि नौसेनेने **ऑपरेशन तलवार** या सांकेतिक नावाने भाग घेऊन शत्रूला नामोहरम केले. कारगिलच्या युध्दात साडेपाचशे जवानांना वीरमरण आले; तर १४०० च्या आसपास जवान जखमी झाले. या सर्व जवानांना, त्यांच्या तप-त्यागाला कोटी कोटी वंदन!

मित्रांनो, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत खडतर जीवन जगत देशाच्या सीमेवर रक्षण करणाऱ्या ज्या सैनिकांमुळे आपण सुखाची झोप घेऊ शकतो. अशा आपल्या भारतीय सैनिकांनी केलेल्या त्यागाबद्दल आपण सर्वांनी सदैव कृतज्ञ राहायला हवे. जय हिंद! ❖



# देवाचा आशीर्वाद

राजू आपल्या मित्रांसोबत मैदानात खेळत होता. खेळून झाल्यावर सगळे मित्र जवळच असलेल्या एका मंदिराच्या पारावर विश्रांतीसाठी बसले. त्यांच्या गप्पा-गोष्टी, हास्य-विनोद चालू असताना एक गृहस्थ मंदिरात आले. आपले बूट बाहेर काढून ते मंदिरात शिरले. दिनू म्हणाला, 'आपण या काकांचे बूट लपवून ठेवू या' मग बाहेर आल्यावर ते शोधाशोध करतील ते बघून खूप मज्जा येईल. चला त्यांची गंमत करु या. राजू म्हणाला, "मित्रांनो, कुणाची अशी चेष्टा करणं बरं नाही. त्यांचे फाटलेले बूट आणि एकंदरीत अवतार पाहता ते खूप गरीब आणि दु:खी आहेत असं दिसतंय. माणूस जेव्हा दु:खी असतो ना, तेव्हा तो आपलं गाऱ्हाणं देवाकडे मांडायला येतो. तेव्हा आपण त्यांची मदत करुन त्यांच्या चेहऱ्यावरचे आश्चर्याचे भाव पाहिले पाहिजेत, नाही का?" गणू म्हणाला, "पण मग काय केलं पाहिजे?" राजूने आपल्या खाऊच्या पैशातले पाच रुपये काढले. त्यानंतर मग कुणी एक रुपया, कुणी दोन रुपये असे

उर्वरित पान क्र. ११ वर



## विचारपुष्प

# सत्संगाची आवश्यकता

एकदा कबीरजींकडे एक जिज्ञासू आला. त्याने कबीरजींना एक प्रश्न विचारला, की आपण नित्यनेमाने सत्संग का केला पाहिजे? त्यावर कबीरजी काहीही न बोलता उठले. त्यांनी एक खिळा घेतला. तो जमिनीवर ठेवून त्यावर हातोड्याने एक घाव घातला आणि पुन्हा ते काही न बोलता आपल्या कामामध्ये दंग झाले. दुसऱ्या दिवशी पुन्हा तोच जिज्ञासू कबीरजींकडे आला. त्याने पुन्हा तोच प्रश्न विचारला, की आपण रोज नित्यनेमाने सत्संग का करावा? कबीरजी आपल्या जागेवरुन उठले. त्यांनी हातोडा घेतला. जमिनीत गाडलेल्या त्या खिळ्यावर पुन्हा एक घाव

घातला आणि आपल्या जागी येऊन आपलं काम करु लागले. अनेक दिवस तो जिज्ञासू हाच प्रश्न घेऊन येई आणि नेहमीप्रमाणे कबीरजी काहीही न बोलता त्या खिळ्यावर पुन्हा पुन्हा घाव घालत. कालांतराने त्या जिज्ञासूच्या लक्षात आलं, की या कृतीतून कबीरजींना काय सांगायचं आहे! ज्याप्रमाणे खिळा जमिनीमध्ये पक्का रुतण्यासाठी त्यावर नेहमी नेहमी घाव घालणे गरजेचे आहे, तसे आपल्या मनावर चांगले संस्कार, चांगल्या सवयी बिंबवण्यासाठी नित्यनेमाने सत्संग करणं गरजेचं आहे. सत्संगामध्ये आल्यावर आपल्या अंतर्मनावर ते ज्ञान, सद्‌गुण चांगल्या प्रकारे रुजले जातात.

अशाच प्रकारे जर आपण एखाद्या क्रिकेटपटूला विचारलं, की तू रोज रोज नेटमध्ये बॅटिंगची प्रॅक्टिस का करतोस? त्यावर तो हेच उत्तर देईल, की बॉलरने कशाही प्रकारे चेंडू टाकला तरी माझ्या नित्यनियमित अभ्यासाने मी प्रत्येक चेंडूला टोलावून सीमापार करु शकेन.

अशाच प्रकारे नित्यनेमाने सत्संग केल्यास आपल्या जीवनामध्ये येणाऱ्या प्रत्येक संकटाचा सामना आपण तेवढ्याच धैर्याने करु शकतो. परिस्थिती कशीही असली तरी आपली मन:स्थिती, आपलं धैर्य, आपला संयम, शिस्त, सहनशीलता जराही डळमळीत होत नाही. आपण सत्संगातून प्राप्त झालेले सद्‌गुण सतत ग्रहण करत राहिलो, तर तेच बाहेर पडतील. जसे, आपल्या शरीरावर कुठेही ओरखडा पडला, तरी त्यातून रक्तच बाहेर पडतं. तसं सत्संगी व्यक्तीच्या जीवनातून कोणत्याही परिस्थितीमध्ये सद्‌गुणांचच दर्शन घडतं. म्हणून जीवनामध्ये सत्संग फार आवश्यक आहे. ❖

## देवाचा आशीर्वाद (पान ०९ वरुन)

जमा केले. असे एकूण पंचवीस रुपये जमले. ते त्यांनी त्या काकांच्या बूटामध्ये ठेवले आणि सगळे मंदिराच्या भिंतीमागे लपून त्यांची गंमत पाहू लागले. ते काका बाहेर आले आणि पाहतात तर काय! बूटामध्ये काहीतरी चमकत आहे. नीट पाहिल्यावर त्यांना ती नाणी दिसली. त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि विलक्षण आनंद दिसत होता. आजूबाजूला तर कोणीच नाही! मग कोणी बरं ही नाणी ठेवली असतील? नक्कीच देवाला माझी दया आली. माझी प्रार्थना ऐकून त्यानेच एखाद्या देवमाणसाला मदतीसाठी पाठवलं असणार. त्यांनी हात जोडत म्हटले, 'देवा, तू किती दयाळू आहेस. बरेच दिवस काम मिळालं नाही. त्यामुळे उपासमार होऊ लागली; पण तू मात्र माझ्या दोन वेळेच्या जेवणाची व्यवस्था केलीस. ज्या कोण्या देवमाणसाने ही मदत केली. त्याचं खूप खूप भलं कर. त्यांना आनंदात ठेव.' असे म्हणून ते भरल्या डोळ्यांनी जायला निघाले. राजू आणि त्याचे मित्र मंदिराच्या आडोशाला उभे राहून हे सारं दृश्य पाहून अवाक् झाले. बिचाऱ्या गरीब माणसाची चेष्टा करुन आपण किती मोठं पाप करणार होतो; पण राजूने आपल्याला त्यातून वाचवलं.

सर्व मित्र म्हणाले, "राजू, खरंच! आज आपल्याला देवाने खूप खूप आशीर्वाद दिले. दुसऱ्याला आनंद देण्याइतकं सुख या जगात काहीच नसेल."

❖ संकलन - नितीन घुरुप (मानगांव)

# एक होऊनि वृक्ष लावू या

चला मित्रांनो, एकजुटीने
एक होऊनि वृक्ष लावू या... ।।ध्रु।।

शुध्द हवा नि शुध्द पाण्याविण
फुका जाती रे जीव गुदमरुन
अन्न वस्त्र आणि निवारा देती
अशा वृक्षराजीचा जीव वाचवू या... ।।१।।

एकेक वृक्ष जणू प्राणवायूचं कक्ष
तया अभावी मानव जीवन रुक्ष
नवचैतन्य तयामध्ये भरण्यासाठी
संदेश सकळां मध्ये जागवू या... ।।२।।

पाऊस पाणी होत आहे कमी
पिकाची नाही कसलीही हमी
बळीराजाला सुखी करण्या
चला वृक्षारोपण सारे करु या... ।।३।।

बहरलेली पाहता फळे-फुले
मन सर्वांचे आनंदाने डोले
चिंब पावसात भिजती मुले
हे दृश्य भूवरी साकार करु या... ।।४।।

ईश्वराने दिली ही सुंदर काया
नका आळसात घालवू वाया
पर्यावरणाचा समतोल राखूनी
धरतीला आपण स्वर्ग बनवू या... ।।५।।

कवी - श्रीकृष्णदास निरंकारी
(गडचिरोली)



# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

प्रश्न : निरंकारी मिशनमध्ये पूजा-पाठ, होम-हवन, पुण्य-दान, व्रत-वैकल्ये इत्यादी कर्मे का केली जात नाहीत ?

उत्तर : वर उल्लेख केलेली सारी कर्म ही शरीर स्वास्थ्यासाठी, सामाजिक जीवनासाठी उपयुक्त आहेत; परंतु आध्यात्मिक जीवनासाठी याचा फार कमी संबंध आहे. ही सारी कर्म मोक्ष किंवा मुक्ती प्रदान करणारी नाहीत. मोक्ष किंवा मुक्ती ही केवळ ब्रह्मज्ञानानेच प्राप्त होऊ शकते. निरंकारी मिशनमध्ये ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून आत्मस्वरुपाची ओळख होते. आत्मा-परमात्म्याच्या मिलनाने जीवाला मोक्ष प्राप्त होतो. ब्रह्मज्ञान अखेरच्या क्षणापर्यंत टिकून राहण्यासाठी सेवा, सत्संग आणि नामस्मरण याच तीन कर्मांची फक्त आवश्यकता असते.

○○○○

प्रश्न : पुरातन काळातील ऋषीमुनी स्नान-संध्या, योगासने, जप-ध्यान, पुण्य दान इ. कर्मे तर करत असत मग ते चुकीचं होतं का ?

उत्तर : नाही. वरील कर्मांचं आपापल्या जागी विशिष्ट महत्त्व आहे; परंतु त्या पाठीमागचा जो भाव आहे तो समजून घेतला पाहिजे. भाव जर समजला नाही तर त्याचा लाभ होण्याऐवजी नुकसानच होऊ शकतं. जसं डॉक्टरांच्या दवाखान्यातील प्रत्येक औषध हे आजार बरा करणारं असतं; परंतु न जाणता कोणतंही औषध घेतलं तर ते जीव घेणारं ठरु शकतं. तसं, कुठल्याही प्रकारचा भावार्थ समजून न घेता केलेलं कर्म हे लाभदायक होत नाही. म्हणून त्या पाठीमागचा भाव समजूनच ती कर्मे केली पाहिजेत. ऋषीमुनी ती कर्म समजून-उमजूनच करत होते; पंरतु आज मात्र त्यामागील मतितार्थ न जाणता ती केवळ एक रीतिरिवाज किंवा कर्मकांड बनलेली आहेत.

स्नान आणि योगासनं हे शारीरिक आरोग्यासाठी आवश्यक आहे. होम-हवन वातावरण शुध्दीसाठी तर दान-धर्म हे सामाजिक कार्यासाठी आवश्यक आहे. जप किंवा ध्यान जर करायचं म्हटलं तर त्यासाठी ज्याचं ध्यान करायचं त्या परमात्म्याला जाणणं गरजेचं आहे. तरच ते कर्म लाभदायक होऊ शकतं.

○○○○



# शब्दकोडे २२०

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ४ | ■ |
| | ■ | | ■ | ५ | | ६ |
| ७ | ८ | ■ | ९ | | ■ | |
| ■ | १० | | ■ | ■ | ११ | ■ |
| १२ | | ■ | १३ | | | १४ |
| ■ | १५ | १६ | | ■ | ■ | |
| १७ | ■ | १८ | | | १९ | |
| २० | | | ■ | ■ | २१ | |

## आडवे शब्द

१. एक पांढरा शुभ्र दगड

५. महाभारताच्या युध्दाचं प्रत्यक्ष वर्णन धृतराष्ट्राला कोणी कथन केले?

७. जशास ..........(म्हण)

९. प्रसिध्द क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनीचा जन्म .....जुलै १९८१ साली झाला.

१०. हत्तीणीचे पुल्लींग

१२. क्षेत्रफळानुसार भारताचे सगळयात लहान राज्य

१३. मुख्यमंत्र्यांची नेमणूक हे करतात.

१५. थंड या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द

१८. संपूर्ण हरदेव वाणीमध्ये एकूण किती पदे आहेत?

२०. श्रीमंत या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द

२१. .......नाही त्याला डर कशाला? (म्हण)

## उभे शब्द

१. श्रीमद्‌भगवद्‌गीता या भाषेत लिहिली आहे.

२. जबलपूर, ग्वाल्हेर आणि उज्जैन ही शहरे ......प्रदेशात आहेत.

३. या ऋतूत कोकीळा गाते.

४. मातीचा किंवा धुळीचा कण

६. मृत्यूदेवता

८. एक प्रसिध्द क्रिकेटपटू : वीरेंद्र ......

११. शुध्द शब्द शोधा : क्रपा / कृपा

१३. भारतरत्न पुरस्कार प्राप्त करणारे पहिले वैज्ञानिक : डॉ. सी.व्ही. .......

१४. या बाळांनो सारे या ....... भरभर सारे या (कवितेची ओळ)

१६. रोज पुरवली जाणारी रसद, उकडा

१७. आंतरराष्ट्रीय न्यायालय कोठे आहे? (हेग/पुणे)

१९. महाराष्ट्र राज्याची स्थापना ....... मे १९६० रोजी झाली.

उत्तरे इतरत्र

# जागतिक व्याघ्र दिन

## वाघांबद्दल काही विशेष गोष्टी



❍ मार्जार (मांजर) कुळातील सर्वात मोठा प्राणी वाघ आहे. पृथ्वीवरील तो तिसरा मोठा मांसाहारी प्राणी आहे. सायबेरियन टायगर हा सुमारे ३०० किलो वजनाचा असतो.

❍ जंगलात मोकळ्या फिरणाऱ्या वाघांपेक्षा बंदी असलेले वाघ अधिक आहेत. जगभरात प्राणीसंग्रहालयात, सर्कसमध्ये तसेच अमेरिकेमध्ये तर घरातही वाघ बंदिवान केले जातात.

❍ वाघांमध्ये पुढच्या पायाच्या तुलनेत मागचे पाय अधिक लांब असतात. त्यामुळे त्यांना लांब झेप घेण्यास मदत होते. एका झेपेत तीस फूट लांबीचा टप्पा ते सहज ओलांडू शकतात. त्यांच्या शेपटीचा झुपका देखील वैशिष्ट्यपूर्ण असतो. तो सुमारे तीन फूट लांब वाढत असल्याने तोल साधला जातो.

❍ कोणत्याही दोन वाघांच्या अंगावर सारखेच पट्टे नसतात. ते प्रत्येकात वेगवेगळे असतात.

❍ वाघांचा शिकार साधण्याचा नेम हा काही ठरलेला नाही. एक शिकार करण्यासाठी त्याला साधारणतः वीस वेळा प्रयत्न करावे लागतात.

❍ जंगलात राहणाऱ्या वाघांचं आयुष्यमान सरासरी दहा ते पंधरा वर्ष असतं, तर बंदी केलेले वाघ वीस ते पंचवीस वर्षांपर्यंत जगू शकतात. कारण त्यांना नियमितपणे आहार मिळत असतो.

❍ पांढऱ्या वाघांचे डोळे निळे असतात.

❍ वाघांच्या लाळेत ॲन्टीसेप्टिक गुणधर्म असतात. त्यामुळे जखम झाली तर जीभेने चाटत ते जखम ठीक करु शकतात.

❍ पाणवठ्याजवळ वाघ जास्त आढळतात. ते दिवसभरात अठरा तास झोपू शकतात.

❍ सायबेरीयन टायगर आपण वाचवू शकलो नाही तर पुढील दहा वर्षात ते संपू शकतात.

❍ वाघाच्या पिल्लांना त्यांची आई जन्मानंतर दोन वर्षे वाढवते, या काळात ते तिच्याकडून शिकार करण्याचे कौशल्यही शिकतात.

❍ वाघाची डरकाळी ३ किलोमीटरपर्यंत ऐकू येते.

❍ वाघाला रात्रीच्या वेळी माणसाच्या सहापट दिसते.

❍ तुम्ही वाघाकडे टक लावून पाहत असाल तर वाघ तुमच्यावर हल्ला करेल अशी शक्यता फारच कमी आहे; कारण तो सावजावर मागून हल्ला करतो.

❍ वाघ उत्कृष्ट जलतरणपटू आहेत आणि अगदी मोठ्या नद्याही सहज पार करु शकतात.

❍ एक प्रौढ वाघ एकाच वेळी चाळीस किलो मांस खाऊ शकतो. त्यानंतर तो चार दिवस शिकार न करता राहू शकतो. ❖





# चित्रकथा

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







आई-बाबा पहा...! माझा परीक्षेत पहिला नंबर आला.
एके दिवशी गावात सिंह शिरला. सिंहाला पाहून सारेजण सैरावैरा पळू लागले.
पळा पळा, तिथं सिंह आहे. चला, सर्वांनी लवकर आपापल्या घरात! सिंह आपल्यावर हल्ला करु शकतो.
सिंहाला पाहून दिनेश आपल्या वडिलांना म्हणाला, बाबा! आपण वन विभागाला फोन करुया का? ते येऊन या सिंहाला जेरबंद करुन घेऊन जातील.
होय बेटा तू अगदी योग्य बोललास.


हॅलो ! साहेब, गावात एक सिंह शिरलाय. त्यामुळे गावात भीतीचं वातावरण पसरलय. कृपया आपण लवकरात लवकर येऊन सिंहाला जेरबंद करुन घेऊन जा.
वन विभागाचे कर्मचारी सिंहाला पिंजऱ्यात पकडून घेऊन जातात.
आपणा सर्वांना माहितच आहे, की काल गावात काय घडलं ते. दिनेशच्या हुशारीमुळे आज आपण सर्वजण सुरक्षित आहोत.
एके दिवशी शाळेतून घरी जाताना दिनेशला एक माणूस रस्त्यात जखमी अवस्थेत पडलेला दिसतो. दिनेश लगेच लोकांच्या मदतीने त्या व्यक्तिला दवाखान्यात घेऊन जातो.


दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून त्या व्यक्तिबद्दल कळते, की ती व्यक्ती शिक्षण विभागातील एक शासकीय अधिकारी आहे.
बाळ दिनेश, तू फार हुशार आहेस. तू ज्याप्रकारे माझा जीव वाचवला आहेस त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे. मी तुला ह्या कार्याबद्दल बक्षीस देणार आहे.
शाळेतील मुख्याध्यापक दिनेशला सर्व विद्यार्थ्यांसमोर पुरस्कार प्रदान करतात.
तात्पर्य: आपल्या सर्वांना नेहमी जागरुक राहून इतरांच्या मदतीसाठी तयार राहिले पाहिजे.



कथा

# शक्तिपेक्षा युक्ती श्रेष्ठ

सत्यवान नावाचे एक सज्जन होते. त्यांना एकुलती एक कन्या होती. तिच्या विवाहासाठी मुलगा शोधायला म्हणून काही दिवसांसाठी त्यांना यात्रेला जायचे होते. त्यांच्याकडे असलेलं धन म्हणजे दहा सोन्याची नाणी; जी मुलीच्या विवाहासाठी त्यांनी जपून ठेवली होती. ते धन चोरी होऊ नये म्हणून त्यांनी एका सावकाराकडे काही काळापुरते ठेवण्यास दिले.

यात्रेहून परत आल्यानंतर ते सावकाराकडे गेले आणि म्हणाले, मी ठेवायला दिलेलं धन मला परत द्या; मुलीसाठी चांगला वर शोधला आहे. आता तिचं लग्न करायचं आहे. सावकाराने मात्र स्पष्टपणे हात वर केले. आपण कुठल्याही प्रकारचं धन माझ्याकडे ठेवायला दिलेलं नाही असं सांगितलं. हे ऐकून सत्यवान चिंतीत झाले. आता मुलीचं लग्न कसं पार पडेल? काय करावं ते सुचेना. त्यांनी आपली समस्या राजाच्या कानावर घातली. राजा हुशार आणि दयाळू होता. राजाला सत्यवानाची अडचण समजली. परंतु हा प्रश्न सुटायचा कसा? कारण सत्यवानाकडे कुठल्याही प्रकारचा लेखी पुरावा नव्हता. इथे बळाचा वापर करुन चालणार नाही म्हणून राजाने क्षणभर विचार करुन एक युक्ती सांगितली. तो म्हणाला, जेव्हा मी रथात बसून

उर्वरित पान क्र. २३ वर

# संत एकनाथ





संत एकनाथांचा जन्म एका ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात इ.स. १५३० मध्ये पैठण येथे झाला. त्यांच्या आईचे नाव रुक्मिणी व वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. ते लहान असतानाच त्यांचे आई-वडील देवाघरी निघून गेले. त्यांचे पालन पोषण आजोबा चक्रपाणि यांनी केले. एकनाथ हे लहानपणापासूनच धार्मिक वृत्तीचे. भजन-पूजनाची त्यांना आवड होती. पुढे त्यांना गुरुच्या भेटीची ओढ लागली. दौलताबादच्या किल्ल्यावर गुरुची भेट होईल असे आजोबांकडून कळल्यावर ते तडक किल्ल्यावर जायला निघाले. त्यावेळी त्यांचे वय केवळ सात-आठ वर्षाचे होते. सुमारे पन्नास मैल अंतर पायी जात ते गडावर पोहोचले.

जनार्दन स्वामींनी त्यांना आलिंगन देत म्हटले, ये बाळ! मी तुझीच वाट बघत होतो. एकनाथांना खूप हायसे वाटले. पुढे चार वर्षे त्यांनी जनार्दन स्वामींची सेवा केली. वयाच्या बाराव्या वर्षी स्वामींनी त्यांना शिष्य म्हणून स्वीकारले. गुरु जनार्दन स्वामींकडे त्यांनी सर्व शास्त्रांचे अध्ययन केले व ते स्वामींसह तीर्थयात्रेस निघाले. चंद्रावती येथे चतु:श्लोकी भागवत व्याख्यान ऐकले. त्यावर गुरुंनी त्यांना चतु:श्लोकी भागवतावर (टीका) विश्लेषण करण्याची आज्ञा केली.

संत एकनाथांचा विवाह गिरीजाबाई यांच्याशी झाला. त्यांना गोदा आणि गंगा नावाच्या दोन मुली आणि हरिपंडित नावाचा मुलगा होता. त्यांनी अनेक ग्रंथांची, भारुडांची रचना करुन लोकांना सन्मार्गाची शिकवण दिली.

एके दिवशी एकनाथजी एकांतात समाधीत असताना एक भयंकर काळा साप त्यांच्या अंगाभोवती विळखा घालून बसला व त्यांच्या डोक्यावर आपला फणा काढून सावली धरु लागला. एकनाथजींची समाधी अवस्था संपताच तो निघून जाई. एकनाथजींना याची अजिबात कल्पना नव्हती. एके दिवशी एकनाथजींसाठी दूध घेऊन आलेल्या गवळ्याने तो साप पाहिला आणि तो जोराने ओरडला. त्या क्षणी एकनाथजींची समाधी भंग पावली. ते उठले आणि सापही निघून गेला. आता एकनाथजींची साधना पूर्ण झाली याची जाणीव गुरु जनार्दन स्वामींना झाली. त्यानंतर त्यांची 'संत एकनाथ महाराज' म्हणून ओळख निर्माण झाली. ❖



# शांततेचा शोध

एकदा एक तरुण गुरुदेवांकडे आला आणि म्हणाला, "गुरुदेव, मला शांतता हवी आहे. तुमच्या आश्रमात मला ती मिळेल का? मला शांततेचा अनुभव घ्यायचा आहे." गुरुदेव म्हणाले, "ठीक आहे. मी सांगतो त्याप्रमाणे तुला ध्यानधारणा करावी लागेल."

काही दिवस त्याला एका स्थिर वस्तूवर ध्यान केंद्रित करण्याचा सराव दिला. त्या सरावानंतर गुरु म्हणाले, "आता एखाद्या आवाजाचे ध्यान कर." तोही सराव पूर्ण केल्यानंतर गुरु म्हणाले, "आता एका हाताच्या टाळीच्या आवाजाचं ध्यान कर. तो आवाज तुला ऐकू आला, की मला सांगायला ये." शिष्य चक्रावला. एका हाताची टाळी वाजतच नाही तर तिचा आवाज कुठून येणार? त्यावर ध्यानधारणा कशी करणार? पण, गुरुआज्ञा म्हणून ध्यानधारणेला जाऊन बसला. एका हाताची टाळी कशी वाजत असेल त्या आवाजाची तो कल्पना करु लागला. अचानक एका झाडावर एका पक्ष्याने हालचाल केली. तो आवाज ऐकून त्याला वाटलं, हाच तो आवाज. तो धावत गुरुंकडे गेला व म्हणाला, "ऐकला! तो आवाज मी ऐकला."

गुरुने त्याला रागाने परत पाठवले. काहीतरी वेड्यासारखे बोलू नकोस. जा! त्या आवाजाचा शोध घेतल्याशिवाय येऊ नकोस. शिष्य बिचारा पुन्हा जाऊन ध्यानास बसला. मध्येच पानांची सळसळ ऐकायला यायची. पक्ष्याचे पंख फडफडायचे. सृष्टीतल्या नाना प्रकारच्या आवाजांमध्ये त्याला एका हाताच्या टाळीचा भास व्हायचा. तो धावत जायचा आणि गुरु रागावले की परत यायचा; पण त्याने चिकाटी सोडली नाही.

एक दिवस मात्र असा उजाडला, की शिष्य काही गुरुकडे आलाच नाही. दुसऱ्या दिवशीही नाही, तिसऱ्या दिवशीही नाही. असे आठ दिवस गेले. तेव्हा गुरु स्वतः शिष्याच्या शोधात निघाले. तो त्याच्या नेहमीच्या ध्यानधारणेच्या जागेवर सापडला. अतिशय प्रसन्न मुद्रेने ध्यानमग्न झाला होता. गुरुने हलक्या हाताने त्याला तंद्रीतून जागं केलं आणि अतिशय कोमल स्वरात ते म्हणाले, "शिष्या! अखेर तुला एका हाताच्या टाळीचा आवाज सापडला तर! अरे एका हाताच्या टाळीचा आवाज म्हणजे शांतता हे तुला कळलं. पण हे सांगायला तू का आला नाहीस माझ्याकडे? मी रागावेन म्हणून घाबरलास?"

"नाही गुरुदेव! ही शांतता आणि तिच्यात एकाग्र होऊन राहणं छान वाटलं. हे ध्यान इतकं सुंदर आहे, की ते सोडून मला कुठेच जावंसं वाटलं नाही. मला काहीतरी मिळालंय, हे ही सांगायची इच्छा उरली नाही. जणू मी स्वतःला विसरुन गेलो होतो. आता मला कळलं की आपण वारंवार का रागवत होतात!"

आतापर्यंत मी बाहेरच्या जगात शांतता शोधत होतो. ती तर माझ्या आतच आहे हे मला समजलं. त्यातील आनंद अनुभवास आला. तुम्ही तर धन्य आहातच; पण तुम्ही मला सुध्दा धन्य केलंत. ❖

## शक्तिपेक्षा युक्ती श्रेष्ठ (पान २० वरुन)

नगरात फेरफटका मारेन, तेव्हा तुम्ही सावकाराच्या पेढीसमोर उभे राहा.

ठरल्याप्रमाणे सत्यवान तेथे उभे राहिले. राजाची स्वारी वाजत-गाजत आली. सावकाराच्या पेढीसमोर उभ्या असलेल्या सत्यवानाकडे बघून राजा रथातून खाली उतरला आणि त्यांचे पाय धरत म्हणाला, "गुरुदेव! आपण इथं काय करता? चला, रथात बसा." असे म्हणून राजाने त्यांना रथात उच्च आसनावर बसवले. रथ पुढे नेल्यानंतर राजाने त्यांना खाली उतरवत सांगितले, "आता तुम्ही निश्चिंतपणे घरी जा. तुमचं धन आपोआप तुम्हाला मिळेल."

इकडे सावकाराला काही चैन पडेना. स्वतः राजा सत्यवानाचा शिष्य आहे हे पाहिल्यावर तो घाबरला. आपले बिंग उघडे पडू नये म्हणून तो रात्रीच त्यांच्या झोपडीत गेला आणि त्यांची क्षमा मागत म्हणाला, "महात्माजी, रात्री खूप शोध घेतला तेव्हा मला तुमची दहा नाणी माझ्याकडे ठेवायला दिल्याची नोंद सापडली. ते धन मी व्याजासह परत करायला आलोय." सत्यवान म्हणाले, मला व्याज नको. त्यावर सावकार म्हणाला, "महाराज, तुमची कन्या ती माझी कन्या. मी स्वतः तिचं लग्न लावून देणार. तुम्ही निश्चिंत राहा."

अशा प्रकारे सत्यवानाला त्याचे धन परत मिळाले आणि मुलीचंही लग्न थाटामाटाने लागलं. ❖

आपले लेख, कविता व कथा या hduniya.marathi@nirankari.org ई-मेल वर पाठवण्यात यावेत. १० वर्षाखालील बालकांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छाचे फोटो २ महिने अगोदर वरील ई-मेल वर पाठवण्याची कृपा करावी.

# पक्षी झाडावर कसे झोपतात?

पक्षी घरटी बांधतात हे खरं, पण त्या घरट्यांचा वापर विणीच्या हंगामात अंडी घालण्यासाठी केला जातो. ती अंडी फुटून त्यातून पिल्ले बाहेर आली, की त्यांच्या पंखांमध्ये स्वतंत्रपणे उडून जाण्याइतकं बळ येईपर्यंत तेही त्या घरट्यामध्ये राहत असतात. त्यांना त्यांचं अन्न भरवण्यासाठी त्यांचे आई-वडील घरट्यात येत असतील तेवढेच. एरवी ते तिथे येऊन राहतात असं नाही. त्यांचे सारे व्यवहार झाडाच्या फांदीवर होतात. काही वेळा विजेच्या किंवा अन्य कुठल्या तारेवरही ते बसलेले आढळतात. तिथेच बसल्या-बसल्या ते झोप कशी काढतात? झोपेत असताना तिथून ते पडत कसे नाहीत? याचं कारण त्यांच्या पायांच्या स्नायूंच्या रचनेत आढळतं. पक्ष्यांच्या गुडघ्याला स्नायूंच्या शिरा जोडलेल्या असतात. त्या मांडीपासून निघून गुडघा पार करुन खाली पायापर्यंत जातात. घोट्याला विळखा घालून त्या पायाच्या बोटांमध्ये विसावतात. जेव्हा हे पक्षी फांदीवर बसतात तेव्हा त्यांच्या वजनामुळे गुडघा आपोआपच मुडपतो आणि त्या शिरा ओढल्या जातात. त्यापायी पायाजवळच्या शिरा ताणल्या जाऊन त्यांच्या बोटांची फांदीवरची पकड कुलूप लावून बंद केल्यासारखी बंदच होऊन जाते. ती उघडायची तर त्यांना काही खास धडपड करावी लागते. त्यांना झोप लागली तर ही पकड बंदच राहते. कारण ती उघडण्यासाठी जी धडपड करण्याची आवश्यकता असते त्यासाठी ते जाणीवपूर्वक प्रयत्न करु शकत नाहीत. ही पकड इतकी घट्ट असते, की कधी काळी त्या फांदीवर किंवा तारेवर बसलेल्या स्थितीतच मरण आलं तरी ती पकड ढिली होत नाही. त्या तारेला लोंबकळलेल्या स्थितीत ते राहतात.

शिवाय हे पक्षी सलग तासन् तास झोपत नाहीत. थोड्या थोड्या डुलक्या वरचेवर काढतात. आपण अशा झोपेला चिऊ-काऊची झोप म्हणतो ते उगीच नाही.

❒ संग्राहक - रुपाली शिंदे (अंबरनाथ)



# महान भक्त



जे महापुरुषांचा द्वेष करतात त्यांच्यावरही महापुरुष प्रेमच करतात. एकदा गुरुमहाराज (गुरु अमरदासजी महाराज) बसले होते. तेवढ्यात एक दुष्टबुध्दीचा गृहस्थ (दातू) मागून आला आणि त्याने त्यांना लाथ मारली. तेव्हा त्या वृध्द गुरुमहाराजांनी त्या दुष्ट व्यक्तीचा पाय धरला. ते पाहून सर्वसामान्य माणसं विचार करु लागली, की आता ते त्याचा पाय पिरगाळून त्याला जमिनीवर आपटतील; पण पुढच्याच क्षणी वेगळंच दृश्य दिसलं. गुरुमहाराजांनी त्या दुष्ट व्यक्तीचा पाय चेपायला सुरुवात केली आणि त्याला म्हणाले, "आता माझ्या अंगावर मांस नाहीये. फक्त हाडं उरलीत, तेव्हा तुझ्या कोमल पायाला दुखापत झाली असेल ना!" अशी असते भक्तांची, महापुरुषांची महानता. आपण जर अशा महापुरुषांना मानत असू, तर आपल्यालाही त्यांच्यासारखं जीवन बनवावं लागेल. तशा भावना अंगी बाणवाव्या लागतील. नेहमी इतरांचं भलं करावं लागेल. ईसा मसीहजी देखील म्हणायचे, की जे तुमच्याशी प्रेमाने वागतात, त्यांच्याशी तुम्ही प्रेमाने वागता यात काही विशेष नाही. खुनी, दरोडेखोरदेखील आपापसांत प्रेमाने वागतात. यात विशेष काही नाही. विशेषता तर भक्तांची आहे. जे लोक त्यांच्याशी वैर धरतात, त्यांचा द्वेष करतात अशा लोकांशीदेखील भक्त प्रेमाने वागतात. त्यांच्या भल्याची कामना करतात. अशा भक्तांचंच नाव मोठं होतं. निराकार हरि-परमात्म्याच्या दरबारात ते श्रेष्ठ आणि महान ठरतात. ❖

# वाढदिवसाच्या


निहारिका खैरे


अर्णव जयस्वाल


अनवीत सावंत


असीमता पेडणेकर



सिध्देश कसबे


आरव शर्मा


समृध्दी कदम


आरोही शेट्ये



शौर्य माने


साई भोईर


स्वस्तिक सुतार


इशाना बिड्ये

# हार्दिक शुभेच्छा



शुभनीत साळुंके



जिजाई पाटील



स्पृहा मुळे



मानसी वाघ



निर्गुण धावरे



श्रध्दा चौगुले



प्रेषित भिसे



स्वरा मोरे



प्रिशा जाधव



सान्वी नाऊंगरे



अक्षज रेडेकर



दिवांशू यादव





# बाणकोट किल्ला

हा किल्ला पोर्तुगीज लोकांनी विजापूरच्या मोहम्मद आदिल शाहकडून सन १५४८ मध्ये जिंकून घेतला. त्यानंतर सन १७०० मध्ये मराठा कोळी सरदार कान्होजी आंग्रे यांनी हा किल्ला जिंकला आणि याचे नाव हिम्मतगड असे ठेवले. तुळाजी आंग्रे आणि पेशव्यांमधील असलेल्या वितुष्टामुळे; पेशव्यांनी इंग्रजांबरोबर मिळून यावर हल्ला केला. सन १७५५ मध्ये हा किल्ला इंग्रजांच्या नाविक जेम्स याने काबीज केला. हे होण्यामागे सुवर्णदुर्ग किल्ला हारण्याचेही कारण आहे. नंतर इंग्रजांनी याचे नाव व्हिक्टोरिया किल्ला असे ठेवले. नंतर इंग्रजांना लक्षात आले, की हा किल्ला ठेवणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही. त्यामुळे तो किल्ला पेशव्यांच्या ताब्यात देण्यात आला. सन १८३७ मध्ये मामलेदार कार्यालय बाणकोट किल्ल्यावरुन मंडणगडावर हलविण्यात आले.

बाणकोट किल्ला मुंबई पासून २०१ किलोमीटर आणि पुण्यापासून १९४ किलोमीटर अंतरावर आहे. या किल्ल्याचे मूळ गाव दापोली पासून ४७ किलोमीटर आणि श्रीवर्धन पासून २१ किलोमीटर अंतरावर आहे.

हा किल्ला दगडांनी बांधलेला आहे. किल्ल्याभोवती खडकात खोदलेले खंदक आहेत. गडाला दोन दरवाजे आहेत. बाणकोट खाडीला लागून असलेले उत्तरी प्रवेशद्वार हे मुख्य द्वार आहे. पश्चिमेचा दरवाजा पठारावर उघडतो. मुख्य प्रवेशद्वारावर ओट्या आहेत. पुढे नगारखाना असून





सावित्री नदी पाहण्यासाठी पायऱ्या चढून जाता येते. पश्चिम दरवाजावरुन तटबंदीवर पोचता येते. बुशेशनजवळ एक गुप्त प्रवेशद्वार आहे. हा बुरुज सिद्दीने बाणकोट किल्ला मजबूत करण्यासाठी बांधला होता. वेळास येथे श्री रामेश्वर आणि श्री काळभैरव देवतांना समर्पित अशी दोन मंदिरे आहेत; जी अनुक्रमे मोरोबा दादा फडणीस आणि नाना फडणीस यांनी बांधली आहेत. ❖

विशेष

## मानवजीवनाची काही रोचक तथ्ये

❍ मनुष्य अन्नाशिवाय तब्बल २ महिन्यांपेक्षाही अधिक काळ जिवंत राहू शकतो; परंतु झोपेशिवाय तो ११ दिवसांपेक्षा अधिक काळ राहू शकत नाही.

❍ मनुष्य त्याच्या संपूर्ण जीवनकाळात तब्बल ३५ टन अन्न खातो.

❍ सर्वसाधारण मनुष्य त्याच्या संपूर्ण जीवनकाळात जवळपास १,२०,००० किमी पायी चालतो.

❍ मनुष्य त्याच्या संपूर्ण जीवनकाळात ५० लाख वेळेस श्वास घेतो.

❍ पुरुष त्याच्या जीवनकाळातील तब्बल ६ महिने दाढी करण्यात खर्च करतो.

❍ मनुष्य त्याच्या संपूर्ण आयुष्यात जवळपास २.५० लाख वेळेस जांभई देतो.

❍ एका संशोधनानुसार ७० लाख व्यक्तींमध्ये फक्त एक व्यक्तीच ११० वर्षे जगू शकते.

❍ एलियन पृथ्वीवर आहेत, यावर अमेरिकेतील ५ पैकी १ व्यक्ती विश्वास ठेवते.

❍ आपली त्वचा ही संपूर्ण आयुष्यभरात ९०० पेक्षाही अधिक वेळेस स्वतःत बदल घडवून आणते.

❍ हे वाचून तर तुम्हाला आश्चर्य वाटेल, की मनुष्य त्याच्या संपूर्ण आयुष्यभरातील जवळजवळ ३ महिने टॉयलेटमध्ये व्यतीत करतो.

❍ पुरुषांपेक्षा महिलांचे आयुष्य हे सरासरी जास्त असते.

❍ जगभरात जितके लोक नाहीत त्याच्यापेक्षाही अधिक सूक्ष्मजीव मनुष्याच्या शरीरावर वास करतात.

❍ आपण स्वप्न तर पाहतो; परंतु ती कोठून सुरु होतात, हे आपल्याला आठवत नाही.

❍ मनुष्य स्वतःला गुदगुल्या करु शकत नाही. कारण मेंदू या गोष्टीला नकार देऊ शकतो.

❍ डोळे उघडे ठेवून शिंकणे अशक्य आहे.

❍ आपल्या मेंदूमध्ये चांगल्या घटना लक्षात ठेवण्याची क्षमता ही वाईट घटना लक्षात ठेवण्याच्या क्षमतेपेक्षा कमी असते. ❖

# हसा मुलांनो हसा



## (राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त - डॉक्टर्स स्पेशल)

डॉक्टर : बोला काय त्रास आहे ?
पेशंट : झोप खूप येते. नेहमी झोपतच असते मी.
डॉक्टर : कोणता मोबाईल वापरता आपण ?
पेशंट : Nokia 1100
डॉक्टर : एक स्मार्ट फोन लिहून देतो, त्यात Sim टाकून Facebook, Whatsapp आणि काही Games install करा; सगळं ठीक होईल!

तरुणी : डॉक्टर, माझं डोकं खूप दुखतंय.
डॉक्टर : मॅडम, सिटीस्कॅन करावा लागेल.
तरुणी : पण माझ्या एकटीच्या त्रासासाठी सगळी सिटी स्कॅन करायची काय गरज आहे डॉक्टर ?

डॉक्टर : तुमच्या पतीला विश्रांतीची गरज आहे. मी झोपेच्या गोळ्या लिहून देतो.
पत्नी : किती वेळा देऊ त्यांना ?
डॉक्टर : त्यांना देऊ नका. तुम्ही घ्यायच्यात.

पेशंट : डॉक्टर, जेव्हा मी झोपतो तेव्हा माझ्या स्वप्नात येऊन माकडं फुटबॉल खेळतात.
डॉक्टर : हे औषध घ्या. आज रात्री झोपण्यापूर्वी खाऊन झोपा.
पेशंट : उद्यापासून खातो डॉक्टर!... आज त्यांची फायनल मॅच आहे ना!

भारतातील एक पंडित अमेरिकेत जातो. त्याला हृदयविकाराचा झटका येतो. नागरिक पटकन त्याला ॲम्ब्युलेन्स घालतात.
पंडितजी : (मोठ्याने ओरडतो) हरी ओम, हरी ओम!
ॲम्ब्युलन्समधला कंपाऊंडर : ड्रायव्हर, गाडी वळवा याला घरी नेऊ.
पंडितजी : अरे मूर्खानो, मला इथे हृदयविकाराचा झटका आला आहे आणि तुम्ही हॉस्पिटलमध्ये नेण्याचं सोडून घरी का आणलंत?
कंपाऊंडर : तुम्हीच तर ओरडत होतात, Hurry Home, Hurry Home

डॉक्टर : (चारुला तपासून) तुला कोणताही आजार झालेला नाही. फक्त विश्रांतीची गरज आहे.
चारु : पण डॉक्टर तुम्ही माझी जीभ तर तपासलीच नाही.
डॉक्टर : तिला देखील विश्रांतीची गरज आहे.

विठू : डॉक्टर, प्लास्टिक सर्जरी करायची आहे; साधारण किती खर्च येईल?
डॉक्टर : ३ लाख रुपये.....
विठू : (थोडा विचार करुन) आणि प्लास्टिक आम्ही आणून दिले तर.... ?
डॉक्टर : मग फेविकोल पण आण... फुकट चिटकवून देतो!

तरुण : डॉक्टर, माझा पाय फार दुखत आहे.
डॉक्टर : (त्याचा पाय बघतात) अरे भाऊ, पाय तर निळा पडलाय. विष पसरलेलं दिसतंय. उद्या पाय कापून त्याजागी नकली पाय लावून देतो.
तरुण : (दोन महिन्यांनी पुन्हा येतो) डॉक्टर, हा नकली पायपण निळा पडतोय.
डॉक्टर : अरेच्चा, आता कुठे खरा आजार माझ्या लक्षात आला. तुझी जिन्स आहे, तिचा निळा रंग जातो आहे.





# सारासार विवेक

पुरातन काळातील ही गोष्ट आहे. कौशल प्रांतात शूरसेन नावाचा राजा राज्य करत होता. एके दिवशी तो शिकारीसाठी जंगलात निघाला. सोबत लवाजमा न घेता एकटाच निघून गेला. खूप वेळ भटकला; परंतु त्याला शिकार काही मिळाली नाही. उन्हामुळे आणि तहान भुकेने त्याचा जीव कासावीस झाला होता. विश्रांतीसाठी तो एका डेरेदार वृक्षाच्या सावलीत बसला. थकल्यामुळे त्याला झोप येऊ लागली. आपल्या जवळचं शस्त्र बाजूला ठेवून तो शांतपणे झोपी गेला.

त्या झाडाच्या फांदीवर एक कावळा बसलेला होता. कावळ्याने बघितले, की खाली राजा गाढ निद्रेत आहे. त्याला राजाची मस्करी करावीशी वाटली. त्याने राजाच्या अंगावर आपली विष्ठा टाकली. राजा झोपेत असल्यामुळे त्याला काही कळलंच नाही.

थोड्या वेळाने कावळा त्या फांदीवरुन उडून गेला आणि त्याच फांदीवर एक कोकीळ पक्षी येऊन बसला. कोकीळ पक्ष्याला वाटलं की राजा थकून झोपलेला आहे. आपण जर मधुर सुरात

कुहू-कुहू गायन केलं तर राजाला प्रसन्न वाटेल. राजा कोकिळच्या मधूर आवाजाने जागा झाला. त्या मधुर स्वरांनी त्याला प्रसन्नता वाटली; परंतु अचानक त्याचं लक्ष आपल्या अंगरख्याकडे गेलं. त्यानं पाहिलं, आपला अंगरखा विष्ठेमुळे खराब झाला आहे.

राजाला खूप क्रोध आला. त्याने वर फांदीकडे बघितलं. त्याला वाटलं, हे या कोकीळ पक्ष्याचंच काम आहे आणि वर मला चिडवत कुहू-कुहू करुन माझी झोपही मोडली. त्याने रागाच्या भरात कोकीळ पक्ष्यावर बाण सोडून त्याला घायाळ केलं.

कोकीळ फांदीवरुन खाली कोसळला आणि वेदनेने विव्हळत म्हणाला, “हे राजन! मी काय गुन्हा केला आहे ? तू मला तीक्ष्ण बाणाने का घायाळ केलंस ? मी तर या वनात राहणारा स्वच्छंद पक्षी आहे, माझ्या मोहक आवाजाने मी सर्वांना आनंद देतो. मी कधी कुणाला दु:खी-कष्टी केलेलं नाही. तरीही मला का मारलंस ?” असे म्हणत त्याने प्राण सोडला. राजाला आपल्या कृतीचा पश्चाताप झाला. सारासार विवेकबुध्दी न वापरता आपण रागाच्या भरात हे काय करुन बसलो ? परंतु आता तर वेळ निघून गेली होती.

तात्पर्य : क्रोधामुळे सारासार विवेकबुध्दी नष्ट होते. त्यामुळे कोणतीही कृती करताना नीट विचार करावा. ❖

विहिरीतील पाण्यात टाकलेली बादली आडवी झाल्याशिवाय त्यात पाणी भरले जात नाही, तसे विनम्र झाल्याशिवाय ज्ञान जीवनात उतरत नाही.



कविता

# आज आहे रविवार

आनंदाच्या भरतीला
होऊ लाटांवर स्वार,
चला करुया धमाल
आज आहे रविवार ।।धृ।।



नाही अभ्यास, ना शाळा
नाही कशाचा कंटाळा,
आज फक्त खेळ खेळा
खेळा भरपूर वेळा!
नाही कसली तक्रार,
आज आहे रविवार ।।१।।

होऊ खेळण्यात दंग
उंच उडवू पतंग,
बांधू मस्तीचाच चंग
उधळूया सप्तरंग!
मजा करायची फार
आज आहे रविवार ।।२।।





आडावर पोहायचं
झाडावर चढायचं
फांदीवर डुलायचं
झोक्यावर झुलायचं!
नाही कसला विचार
आज आहे रविवार ।।३।।

काढू मधाचे पोळे
चाखू मध ते पिवळे
खाऊ ताडाचे गोळे
पिऊ मधूर शहाळे
नाही होणार आजार
आज आहे रविवार ।।४।।



कवी - राज भिंगारे

# आला पावसाळा तब्येत सांभाळा



नुकताच पावसाळा सुरु झाला आहे. साहजिकच पावसात भिजायला सर्वांना आवडते. परंतु मित्रांनो, या सुखद अनुभवा-बरोबरच वेगवेगळे आजारही सोबत येतात बरं का! आणि हे वातावरणही जीवजंतूसाठी पोषक असतं, म्हणून जंतूसंसर्ग होऊन साथीचे आजार लवकर पसरतात.

पावसाळ्यात आढळणाऱ्या सामान्य व्याधी म्हणजे ताप, सर्दी, खोकला, जुलाब, अतिसार, उलट्या होणे. पावसाळ्यातील विषाणूजन्य व्याधी म्हणजे मलेरिया, हिवताप, स्वाईन फ्लू, चिकनगुनिया, कावीळ, कॉलरा. योग्य पध्दतीने काळजी न घेतल्यास वरील आजारांची तीव्रता कमी अधिक प्रमाणात जाणवते.

पावसाळ्यातील आजारांपासून आपले व आपल्या कुटुंबियांचे रक्षण करण्यासाठी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी.

- पावसाळ्यात पाणी गाळून व उकळून पिण्याचा सल्ला दिला जातो. तो अवश्य पाळावा. तसेच जेवताना कोमट पाणी पिणेही हितकारक असते.
- या काळात सर्व प्रकारच्या भाज्या व फळे स्वच्छ धुवून घ्यावेत. फळभाज्या स्वच्छ धुतल्या नाहीत तर पोटाचे विकार होण्याची शक्यता वाढते.
- बराच काळ उघड्यावर राहिलेले खाद्यपदार्थ शरीरात इन्फेक्शन निर्माण करु शकतात. त्यामुळे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाणे टाळावे.
- दूषित हवेमुळे होणारे आजार टाळण्यासाठी दररोज सकाळ, संध्याकाळ घरामध्ये वेखंड, गुग्गुळाचा धूर करावा.
- गाईच्या दुधात हळद, सुंठ व तुळशीची पाने उकळून सेवन केल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढते.
- पावसाळ्यात पचनशक्ती कमकुवत झालेली असल्याने तळलेले, आंबवलेले पदार्थ, शिळे अन्न, बेकरीचे पदार्थ, मसालेदार व चमचमीत पदार्थ, फास्ट फूड खाणे आरोग्यास हानिकारक ठरते.
- फ्रिजमधील अतिथंड पाणी पिणे, कोल्ड ड्रिंक्स, आईस्क्रीम यामुळे भूक मंदावते. सर्दी, खोकला यासारखे आजार लवकर होतात.
- रात्री झोपताना कोमट पाणी प्यावे. यामुळे वजन नियंत्रित राहून व शरीरही हलके राहते.
- पावसाळ्यात लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. अतिसार, मलेरिया, गोवर, कांजण्या या व्याधींचे प्रमाण लहान बालकांमध्ये वाढलेले दिसते.







हे टाळण्यासाठी मुलांना आयुर्वेदिक चूर्ण, घरगुती काढे इ. औषधे प्रशिक्षित डॉक्टर/ वैद्यांच्या सल्ल्याने नियमित द्यावीत.

- पावसाळ्यात जठराग्नी मंद झाल्याने भूक कमी होते. त्यामुळे अशक्तपणा वाढतो. रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. यासाठी सूंठ घालून पाणी उकळून प्यावे. तसेच हलका आहार घ्यावा.
- आपले बूट, मोजे आणि रेनकोट जास्त वेळ अंगावर राहू देऊ नये. यामुळे इन्फेक्शन होण्याची दाट शक्यता असते. घरात आल्यावर हात-पाय स्वच्छ धुवून ते कोरडे करावेत.
- घराचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा. छतावर, टायरमध्ये पाणी साचू देऊ नये. तसेच औषध फवारणी करुन घ्यावी.

अशा पध्दतीने सोपे नियम पाळून आपण अनेक अवघड आजारांपासून लांब राहून पावसाळ्याचा मनमुराद आनंद घेऊ शकतो. आजारी पडण्यापेक्षा आजार होऊ नये म्हणून काळजी घेतलेली केव्हाही उत्तमच, नाही का! ❖

विशेष

# आला अधिकमास !

(१८ जुलै २०२३ पासून अधिकमास सुरु होत आहे, त्या निमित्ताने)

## अधिकमास म्हणजे काय ?

चांद्रवर्ष म्हणजेच चंद्राच्या कलेनुसार प्रथमा, द्वितीया, तृतिया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, अष्टमी, नवमी, दशमी, एकादशी, द्वादशी, त्रयोदशी, चतुर्दशी, पौर्णिमा किंवा अमावस्या या तिथींवरुन केलेली कालगणना तसेच सौर वर्ष (भारतीय वर्ष) चैत्र, वैशाख... ते माघ, फाल्गुन या १२ महिन्यांचा काळ. चांद्रवर्ष व सौर वर्ष यांच्यातील परस्पर ससंबंध कायम राखण्यासाठी जवळ-जवळ बत्तीस ते तेहत्तीस चांद्रमासांनंतर एकाच चांद्रवर्षात जो एक वाढीव किंवा अधिक महिना मोजावा लागतो; त्यालाच 'अधिक मास' म्हणतात. यालाच कुठे-कुठे मलमास, पुरुषोत्तम मास आणि महाराष्ट्रात धोंडामास असेही म्हणतात.

साधारणत: प्रत्येक चांद्रमासात एक सौर संक्रांती होत असते. ज्या महिन्यात अशी एकही सौर संक्रांती घडत नाही; म्हणजेच जो चांद्रमास संपूर्णपणे दोन संक्रांतीच्या दरम्यान येतो. तो अधिक मास समजतात. यावरुनच आपल्याकडे 'दुष्काळात तेरावा महिना' अशी म्हण रुढ झाली आहे.

## अधिकमास कसा होतो ?

सूर्याची मेष संक्रांती समजा चैत्र-अमावस्येला घडली व त्याची वृषभ-संक्रांती वैशाखात न होता ती त्याच्या समोरील महिन्याच्या प्रतिपदेस घडली तर हा संक्रांतीविरहित अधिक महिना, अधिक वैशाख ठरतो, व त्यापुढील महिना हा निज-वैशाख म्हणून ओळखला जाईल.

चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे दर १२ वर्षांनी, आषाढ हा १८ वर्षांनी, भाद्रपद हा २४ वर्षांनी, आश्विन हा १४१ वर्षांनी तर कार्तिक हा ७०० वर्षांनंतर अधिक मास होत असतो. भाद्रपद पर्यंतच्याच मासांना (महिन्यांना) अधिक मास म्हणतात. अश्विन व कार्तिक हे अधिक झाले तरी त्यांना तसे संबोधण्याची प्रथा नाही.

अधिक मास १६ ऑगस्ट २०२३ रोजी संपणार आहे. ❖

# कथनी-करणी एकसमान



स्वामीजींनी अमेरिकेतील बऱ्याच शहरांना भेटी दिल्या. असेच एकदा वेस्टर्न अमेरिकन टाऊन येथील सभागृहात स्वामीजींचे भाषण होते, त्यात ते म्हणाले, "ज्याला अंतिम सत्य किंवा ज्ञान लाभलेले असते, ती व्यक्ती प्रत्येक प्रसंगांमध्ये स्थिर, एकाग्र आणि शांत राहते. बाह्य घटनांनी ती कधीही विचलित होत नाही."

स्वामीजींच्या प्रवचनातील हे वाक्य ऐकताच एका खोडसाळ व्यक्तीने त्यांची परीक्षा घ्यायची ठरवली. त्याने स्वामीजींना आपल्या गावामध्ये भाषणासाठी आमंत्रित केले.

स्वामीजी जेव्हा त्यांच्या गावी गेले, त्यावेळी त्याने श्रोत्यांना सांगितले, की आज स्वामीजी पालथ्या घातलेल्या पाण्याच्या पिंपावर उभे राहून प्रवचन करतील.

स्वामीजी सहजपणे उठले आणि पालथ्या घातलेल्या पिंपावर उभे राहिले. त्यांनी प्रवचनाला सुरुवात केली. त्यांच्या ओघवत्या वाणीने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. ते बघून त्या खोडसाळ व्यक्तीने स्वामीजींना विचलित करण्यासाठी बंदुकीच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. बंदुकीच्या गोळ्या त्यांच्या कानाजवळून जात होत्या; परंतु त्या बंदुकीच्या आवाजाचा स्वामीजींवर काहीही परिणाम झाला नाही. त्यांनी शांत मनाने आपले प्रवचन पूर्ण केले. प्रवचन पूर्ण झालं त्यावेळी सारे श्रोते त्यांच्या अवतीभवती जमा झाले. त्यांच्याशी हस्तांदोलन करु लागले. त्या गावचा प्रमुख म्हणाला, "स्वामीजी, आपण खरोखरच महान आहात! आपण जसे सांगता अगदी तसंच आपलं जीवनही आहे. आमच्याकडून काही आगळीक घडली असेल तर आम्हाला क्षमा करा."

अशा प्रकारे स्वामीजींनी आपल्या कर्मातून लोकांना शिकवण दिली. स्वामीजींच्या जीवनामध्ये असे अनेक प्रसंग घडले; पण त्यांच्या कथनी आणि करणीमध्ये तसूभरही फरक पडला नाही.

❒ संग्राहक - सुकदेव पाटील

# यंदा हे प्रॉमिस पूर्ण करायचंय

आठवतंय का मित्रा ?.....
वार्षिक परीक्षेला सामोरं जाण्यापूर्वी
निराश झाला होतास.... अभ्यास पूर्ण झाला नाही म्हणून!
पुढच्या वेळी नक्की लवकर अभ्यास चालू करेन,
असं स्वत:च स्वत:ला प्रॉमिस केलं होतंस...
यंदा हे प्रॉमिस पूर्ण करायचंय.

जर मागच्या वर्षाची पुस्तकं आजही उघडली,
आणि छान सुगंध येत असेल तर,
याचा अर्थ त्या पुस्तकांचा अभ्यास पूर्ण झाला नाही...
यंदाच्या वर्षी पुस्तकांचा सुगंध आणि अभ्यास दोन्ही लवकर संपवायचंय
यंदा हे प्रॉमिस पूर्ण करायचंय.

मोबाईलचे गेम खेळता खेळता
मित्रांसोबत पकडा पकडी, लगोरी अन् आबाधुबी खेळायचं राहूनच गेलं....
यावर्षी वर्चुअल नाही तर,
मैदानात घामाने चिंब होईपर्यंत खेळायचंय....
यंदा हे प्रॉमिस पूर्ण करायचंय.

शाळा, ट्युशन, क्लासेस यांच्या गडबडीमध्ये,
सत्संगासाठी वेळ द्यायचं राहूनच गेलं....
आनंदी जीवनासाठी शैक्षणिक प्रगती आणि अध्यात्मिकतेलाही जोडून राहायचंय,
म्हणून सत्संग, सेवा अन् स्मरण नियमित करायचंय....
यंदा हे प्रॉमिस पूर्णच करायचंय.

कवी - अनिल कदम (मुंबई)

# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







किट्टी बघ, मी नवीन कंपासपेटी आणली आहे.
फारच छान! मला आजच्या दिवस ही कंपास पेटी दे. मी तुला उद्या परत करेन.
किट्टी, तू माझी कंपास पेटी तोडलीस. मी तुझ्या आईकडे तुझी तक्रार करणार
काकू, किट्टी ने पहा माझी कंपासपेटी आणि मीनाचं खेळणं तोडून टाकलं.
अगं नाही आई. मी जाणूनबुजून नाही तोडलं. मी तर खेळत होते आणि ते तुटलं.


किटी हे फार चुकीचं आहे. लवकर माफी माग ह्या दोघींची
नाही आई!
मला किटीला तिच्या चुकीची जाणीव करुन दिली पाहिजे
आई, मला पैसे दे. मला नवीन खेळणं आणायचं आहे.
किटी, तू तुझ्या पॉकेटमनीतून पैसे घे.
आई, हे बघ माझं नवीन खेळणं


आई, मी झोपायला जातेय
आता मी हे खेळणं लपवून ठेवते आणि किटीला तोपर्यंत सांगणार नाही जोपर्यंत तिला तिच्या चुकीची जाणीव होत नाही.
आई माझं खेळणं कुठे आहे ?
मला माहीत नाही किट्टी. नाही मिळत तर तू नवीन घेऊन ये.
पण आई, ते माझं आवडतं खेळणं होतं.
मला माफ करा नंदू आणि मीना. आता मला समजलं, की आपली आवडती वस्तू तुटल्यावर कसं वाटतं ते !






२०२० पर्यंत



२०२० नंतर

विशेष - पुरस्कार

# क्रीडा पुरस्कार

क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी दरवर्षी राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयातर्फे या पुरस्कारांची घोषणा केली जाते आणि दरवर्षी मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते क्रीडा पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

## मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा भारतातील सर्वोच्च क्रीडा पुरस्कार आहे. युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाद्वारे या पुरस्काराची सुरुवात १९९१ मध्ये झाली. २०२० पर्यंत या पुरस्कारास राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार नावाने संबोधले जात होते.

चार वर्षे क्रीडा क्षेत्रातील नेत्रदीपक आणि सर्वाधिक उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. क्रीडा क्षेत्रातील हा सर्वोच्च पुरस्कार असून आतापर्यंत (म्हणजे २०२०पर्यंत) ३३ खेळाडूंना देण्यात आला आहे. या पुरस्काराचा पहिला विजेता - विश्वनाथन आनंद -१९९२ (बुध्दीबळ) हा होता तर २०२० यावर्षी खेलरत्न पुरस्कारांच्या इतिहासात पहिल्यांदाच ५ खेळाडूंची निवड खेलरत्न पुरस्कारासाठी करण्यात आली.

१) श्री. रोहित शर्मा - क्रिकेट
२) श्री. मरियप्पन टी. - पॅरा ॲथलेटिक्स
३) कु. मनिका बात्रा - टेबल टेनिस
४) कु. दिनेश फोगट - कुस्ती
५) कु. राणी रामपाल - हॉकी

पुरस्काराचे स्वरुप - पदक व रोख रक्कम रु. २५ लाख व मानचिन्ह

२००१ मध्ये नेमबाज अभिनव बिंद्रा हा सर्वात तरुण वयात (१८ वर्षे) हा पुरस्कार मिळवणारा खेळाडू ठरला.

# अर्जुन पुरस्कार

भारत सरकारद्वारा वर्षातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले जाते. हा पुरस्कार १९६१ पासून देण्यात येत आहे. या पुरस्काराचा उद्देश खेळाडूंना सन्मानित करुन त्यांना खेळाप्रती उत्साहित करणे हा आहे. हा पुरस्कार अशा खेळाडूंना दिला जातो, जे आपल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावतात; परंतु एवढेच नव्हे तर खेळाचा प्रचार आणि प्रसार करतात आणि स्वत: खेळाडू म्हणून निवृत्त झाले तरी वैयक्तिक पातळीवर खेळामध्ये आपले अमूल्य योगदान प्रदान करतात. एखाद्या वर्षाच्या पुरस्कारासाठी खेळाडूची निवड करताना, त्याच्या त्या वर्षाच्या सर्वोत्कृष्ट प्रावीण्याबरोबरच तत्पूर्वीच्या तीन वर्षातील राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्याचे क्रीडा-नैपुण्यही विचारात घेतले जाते. एकाच खेळाडूस हा पुरस्कार दोनदा दिला जात नाही. हा पुरस्कार पदक व शिफारसपत्र या स्वरुपात असतो. ए.आय.सी.एस. ने मान्यता दिलेल्या प्रति वर्ष जास्तीत जास्त पंधरा खेळाडूंची अर्जुन पुरस्कारासाठी निवड केली जाते; परंतु सन २०१० मध्ये एकूण १९ खेळाडूंना हा सन्मान प्रदान करण्यात आला होता. आतापर्यंत एकूण ७०० खेळाडूंना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्कारात रोख रकमेचा व विशेषाधिकारांचा समावेश नसतो. हे पदक ब्रांझचे असून ते मत्स्यवेध करणाऱ्या धनुर्धारी अर्जुनाच्या शिल्पाकृतीचे असते. शिफारसपत्रामध्ये अर्जुनाचे चित्र व इंग्रजी-हिंदी भाषांतून खेळाडूचे नाव, क्रीडाप्रकार व वर्ष यांचा निर्देश असतो. या शिफारसपत्राच्या वरील बाजूस भारत सरकारचे बोधचिन्ह व खालील बाजूस मंत्रालयाच्या सचिवाची स्वाक्षरी असते. गुरुबचनसिंह रंधावा यांना एथलेटिक्स या क्रीडा प्रकारासाठी सर्वप्रथम या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

- संग्राहक - नीलेश माने (अंबरनाथ)

## हार्दिक अभिनंदन



अमृतसर (पंजाब) येथे नुकत्याच झालेल्या नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत नाशिक वॉरियर्स कराटे ॲकेडमीचे खेळाडू वंशज विभांडिक (१० वर्षे वयोगट) आणि रश्मिता विभांडिक (१५ वर्षे वयोगट) यांनी चमकदार कामगिरी केली.

वंशज विभांडिक याने दोन सुवर्णपदके, तर रश्मीता विभांडिक हिने एक सुवर्ण व एक रौप्यपदक प्राप्त केले. नाशिकच्या बालसत्संगातील या बालकांचा सत्कार स्थानिक संयोजक महात्मा आ. गुलाब पंजवानीजी यांच्या हस्ते सत्संगामध्ये करण्यात आला.



# प्रोत्साहन

काही माणसं मागे का पडतात? याचं कारण त्यांना वाटत असलेली भीती. एक तर स्वत:च्या कर्तृत्वाविषयी म्हणजे आपल्याला जमेल की नाही अशी शंका आल्यामुळे किंवा कोणी आपल्याला रागावणार तर नाही ना, यामुळेही बरेच जण प्रगती करु शकत नाही; परंतु जर योग्य प्रोत्साहन मिळालं तर मनुष्य निर्भय होऊन प्रगती करु शकतो. असंच एक उदाहरण इतिहासात पाहायला मिळतं.

अहमदाबादमध्ये प्रख्यात वैज्ञानिक विक्रम साराभाई यांनी महात्मा गांधी सायन्स लॅबोरेटरी सुरु केली होती. या प्रयोगशाळेत प्रयोग करताना दोन विद्यार्थ्यांकडून एक मोठी चूक झाली. ती म्हणजे एक अतिशय महागडी अशी मोटार जास्त दाबाच्या वीजप्रवाहामुळे जळून गेली. आता आपल्याला विक्रम साराभाई या संस्थेतून काढून टाकतील किंवा खूप रागावतील म्हणून ते घाबरले होते. त्यांची अवस्था पाहून विक्रम साराभाईंनी

त्यांना प्रेमाने विचारले, "काय रे बाळांनो! काय झालं घाबरायला?" त्यावर एक विद्यार्थी भीतभीतच म्हणाला, "सर, आमच्याकडून खूप मोठी चूक झाली. हाय व्होल्टेजमुळे मोटार जळून गेली आणि ती बाजारात कुठेही मिळत नाही." हे ऐकून खरंतर साराभाईंना देखील धक्का बसला; परंतु चटकन स्वत:ला सावरत चेहऱ्यावर कुठलीही नाराजी न दाखवत ते म्हणाले, "अरे एवढंच ना! मग त्यात एवढं काय घाबरायचं! आज नाही तर उद्या मोटार मिळेल; पण हिंमत कशाला हारता? आणि हो चुकल्याशिवाय का कोणी शिकत असतो!" असे म्हणून ते आपल्या कामाला निघून गेले. त्यांच्या या शब्दामुळे विद्यार्थ्यांच्या मनावरचा भार उतरला. त्यांना अगदी मोकळं झाल्यासारखं वाटलं. साराभाईंच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून ते मनोमन नतमस्तक होत त्यांना धन्यवाद देऊ लागले. पुढे मात्र अतिशय मेहनत घेऊन त्यांनी आपला प्रकल्प पूर्ण केला आणि स्वत:च्या कमाईतून आपल्या हातून जळालेली मोटर प्रयोगशाळेत आणून ठेवली.

विक्रम साराभाईंचं प्रोत्साहन त्या विद्यार्थ्यांना लाभलं नसतं तर ते पुढे प्रगती करु शकले नसते. कदाचित त्यांचं करियर घडलं नसतं. प्रोत्साहानामुळे मनुष्य प्रगती करु शकतो. ❖

**नतमस्तक होणं ही कमजोरीची निशाणी नाही, नेहमी मन विनम्र पण विचारसरणी उच्च असायला पाहिजे. कधीही अभिमान येऊ देऊ नये. लहानशी मुंगी वाळूमध्ये पडलेला साखरेचा कण अलगद उचलते; परंतु विशालकाय हत्तीच्या वाट्याला एखादा साखरेचा कण येतो बाकी सर्व वाळूच येते. –सद्‌गुरु बाबाजी**



कविता

# चला जाऊ शाळेच्या गावा

चला चला रे दोस्तांनो, जाऊया शाळेच्या गावा
अ आ इ ई गिरवताना, बनू मराठमोळा छावा

इंग्रजी मराठी नि हिंदी, भूगोल विज्ञान इतिहास
वाचूया पाठ्यपुस्तकेही, अभ्यासाचा घेऊ ध्यास

परी राणीच्या दुनियेत, जावूया भिजुनी चिंब
सोडू होड्या पाण्यात, पाहू नभाचे प्रतिबिंब

फिरु खेळू दोस्तांसगे, माळावरही उडवू पतंग
सण होळीचा आलाय, रंगातच मिसळूया रंग

क्रिकेट कबड्डी हॉकी, खेळूया आट्यापाट्या
करु अभ्यास मनाने, देऊ शाळेत कसोट्या

आवडते मला शाळा, शिकीन सारेच अक्षर
कथा कविता वाचण्या, होईनच मीही साक्षर

कवयित्री - सौ. भारती सावंत (मुंबई)





# द्रष्टा

**महात्मा गांधीजींना प्रत्येक भारतीयाबद्दल व देशाबद्दल असलेली तळमळ दाखविणारा हा एक प्रेरक प्रसंग**

महात्मा गांधीजी तिहार जेलमध्ये होते त्यावेळचा हा प्रसंग आहे. ते जेलमध्ये असताना त्यांची नातही त्यांच्यासोबत होती. तिला जेलमध्ये लिखाण करायचं होतं. तिने जेलरकडून वही मागवली, त्या वहीची किंमत होती दीड रुपया. गांधीजी नातीवर रागावत म्हणाले, “मी स्वत: जुन्या कॅलेंडरच्या मागच्या कोऱ्या पानावर लिहितो. छोट्या नोंदी करण्यासाठी वापरलेल्या तिकिटावरील कोऱ्या जागेवर लिहितो आणि तू दीड रुपयाची वही मागवली? या खर्चाचा बोजा भारतीय जनतेवर पडेल आणि ते आपल्या देशाला परवडणारे नाही. कागदाचा वापर काटकसरीने केला पाहिजे. कागदाचा लगदा तयार करण्यासाठी हजारो झाडं तोडली जातात. कागदाचा काटकसरीने वापर करुन आपण निसर्गाचंही रक्षण केलं पाहिजे.”

एकदा त्यांचे सहकारी मणिभाई यांनी ग्लासभर पाणी प्यायला घेतले. अर्धा ग्लास पाणी पिऊन उरलेले पाणी ते फेकणार तेवढ्यात गांधीजी म्हणाले, “मणिभाई जेवढं आवश्यक आहे तेवढं पाणी प्यावं. प्रत्येक भारतीयाने अर्धा ग्लास पाणी जरी वाचवलं तरी करोडो लीटर पाण्याची बचत होईल. काही भागात तर मैलोन मैल पाण्यासाठी वणवण करत फिरावे लागते. पाण्याचा जपून वापर करा. अन्यथा पुढील पिढी आपल्याला क्षमा करणार नाही.”

मित्रांनो आपल्या राष्ट्रपुरुषांना ‘द्रष्टा’ असे म्हटले जाते. द्रष्टा याचा अर्थ पुढे घडणाऱ्या घटना किंवा भविष्यात कोणती स्थिती निर्माण होईल याचा अंदाज बांधणारे. भविष्यातील धोक्याची सूचना देऊनही आपण जेव्हा दुर्लक्ष केले त्याचे परिणाम आज आपल्याला दिसून येत आहेत. म्हणून थोर पुरुषांची जीवन चरित्रे किंवा त्यांचे विचार केवळ वाचण्यासाठी नसतात तर आचरणात आणण्यासाठी असतात.

चला तर, नैसर्गिक संपत्तीचा काटकसरीने वापर करु आणि पर्यावरणाचे रक्षण करु! हीच खरी देशसेवा ठरेल. ❖



# योग्य पर्याय निवडा

१) बांग्लादेशात गंगा नदी कोणत्या नावाने ओळखली जाते ? - पद्मा / कृष्णा

२) वातावरणातील सर्वात हलका वायू कोणता ? - हेलियम / हायड्रोजन

३) एक जीबी मध्ये किती एमबी असतात ? - १०२४ / १०००

४) मध्यप्रदेशाचं विभाजन करुन कोणतं राज्य तयार झालं ? - छत्तीसगड / झारखंड

५) इतिहासात कौटिल्य असं कोणाचं नाव आहे ? - आर्य भट्ट / आर्य चाणक्य

६) आग्र्याचा लाल किल्ला कोणी बांधला ? - जहांगीर / अकबर

७) सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह कोणता ? - गुरु / शनी

८) कोणता प्राणी आपली सारी कामं नाकाने करतो ? - खवले मांजर / हत्ती

९) माता सीतेच्या वडिलांचे नाव काय होते ? - राजा जनक / राजा हरिश्चंद्र

१०) इंटरनेटचा उपयोग सर्वप्रथम कोणत्या देशाने केला ? - अमेरिका / जपान

११) भारतातील कोणत्या राज्यात रेल्वेमार्ग नाही ? - सिक्कीम / मेघालय

१२) भारतातील कोणत्या राज्यात सर्वात जास्त पाऊस पडतो ? - मेघालय / आसाम

१३) इंस्टाग्रामला कोणती कंपनी चालवते ? - फेसबुक / गुगल

१४) शरयू नदीच्या किनारी कोणतं शहर वसलेलं आहे ? - जबलपूर / अयोध्या

१५) एका फुटबॉल टीममध्ये किती खेळाडू असतात ? - ११/ १२

उत्तरे इतरत्र

# १२ वी नंतर विविध सामाईक प्रवेश परीक्षा (CET)

| प्रवेश परीक्षा | या अभ्यासक्रमात प्रवेशाकरीता | परीक्षा घेणारी संस्था | वेबसाईट |
|---|---|---|---|
| MH-CET | Engineering | महाराष्ट्र शासन | https://cetcell.mahacet.org/ |
| JEE-MAIN | Engineering & Tech. | राष्ट्रीय परीक्षा संस्था -NTA | https://jeemain.nta.nic.in |
| JEE-Advance | Engineering & Tech. | राष्ट्रीय परीक्षा संस्था -NTA | https://jeeadv.ac.in/ |
| BITSAT | Engineering & Tech. | BITS पिलानी | https://www.bitsadmission.com/ |
| NDA | Engineering & B-Tech. | विद्यापीठ अनुदान आयोग/UGC | https://www.upsc.gov.in/ |
| NEET | Medical -MBBS/BDS | राष्ट्रीय परीक्षा संस्था -NTA | https://nta.ac.in |
| AIEEA | UG in Agriculture | ICAR / NTA | https://cuet.samarth.ac.in/ |
| CET-AGRI | UG in Agriculture | CET / ARA | https://ug.agriadmission.in/ |
| ----- | Indian Navy B-Tech | भारतीय नौसेना Indian Navy | https://joinindiannavy.gov.in/ |
| NIFT | Design, Management & Technology - Fashion | राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था / NIFT | https://www.nift.ac.in/ |
| CET-LAW | UG- LLB | महाराष्ट्र शासन | https://cetcell.mahacet.org/ |

या साऱ्या सामाईक परीक्षांची नोटीस साधारण दरवर्षी फेब्रुवारी, मार्च महिन्यात वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांतून प्रकाशित केली जातात.





फक्त शास्त्र शाखा म्हणजेच करिअर या पालक-विद्यार्थ्यांच्या समजुतीस छेद देणारा आणि १० वी नंतर आर्ट्स, वाणिज्य, शास्त्र या कुठल्याही शाखेतून गेल्यास उपलब्ध असणारे पर्याय दाखवणारा करिअर ट्री

# रंग भरा



गुरु पौर्णिमा



## शब्दकोडे २२० चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ सं | ग | २ म | र | ३ व | ४ र | |
| स्कृ | | ध्य | | ५ सं | ज | ६ य |
| ७ त | ८ से | | ९ सा | त | | म |
| | १० ह | ती | | | ११ कृ | |
| १२ गो | वा | | १३ रा | ज्य | पा | १४ ल |
| | १५ ग | १६ र | म | | | व |
| १७ हे | | १८ ती | न | शे | १९ ए | क |
| २० ग | री | ब | | | २१ क | र |

## सामान्यज्ञान उत्तरे

१) पद्मा
२) हायड्रोजन
३) १०२४
४) छत्तीसगड
५) आर्य चाणक्य
६) अकबर
७) गुरु
८) हत्ती
९) राजा जनक
१०) अमेरिका
११) सिक्कीम
१२) मेघालय
१३) फेसबुक
१४) अयोध्या
१५) ११

!! तू ही निरंकार !!

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी।
पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी।
पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा। घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है। ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।
गुरू की जैं जैं जो करता हैं उसकी होती जैं जैं कार।
गुरू की पूजा जो करता हैं उसको पूजे कुल संसार।

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

